परवानगी वर्ष :- १९९९-२००० <br>
माध्यम : मराठी <br>
कायम विनाअनुदानित <br>
(माध्यमिक)

जा.क्र.शिउसं/माध्य-३०२/प्र.मा./पुवि/२०१८/ 18040 <br>
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, <br>
पुणे-१ यांचे कार्यालय <br>
दिनांक : 2 NOV 2018

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) <br>
जिल्हा परिषद, पुणे

**विषय :-** **मराठी माध्यम कायम विनाअनुदानित शाळेस इ.९ वी व इ. १० वी जून-२०१८ पासून प्रथम मान्यता मिळणेबाबत.**
**सुसंपन्न ज्ञान प्रसारक मंडळ, पुणे संचलित माध्यमिक विद्यालय,आढले खुर्द ता.मावळ जि.पुणे**

**संदर्भ :-** १ शालेय शिक्षण विभाग, मुंबई कडील शासन पत्र जा.क्र.नमाशा/१०९९/६८२/९९/माशि-१, दिनांक ९.७.१९९९
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मुंबई यांचे पत्र क्र.माशास्थ ३३१६/प्र.क्र.२६९/एसएम-१, दिनांक २९.९.२०१७
३.शिक्षणाधिकारी ( माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे यांचे पत्र क्र.जि.प/शिक्षण/माध्य/सांक्र/२०१८/६१०३, दि.४.१०.२०१८

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२ व ३.३ अन्वये **सुसंपन्न ज्ञान प्रसारक मंडळ, पुणे संचलित माध्यमिक विद्यालय,कानसे,ता.आंबेगांव जि.पुणे** या माध्यमिक शाळेस संदर्भीय क्र. १ चे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मुंबई कडील शासन पत्रानुसार **इ. ८ वी मराठी माध्यम वर्गास कायम विनाअनुदानित तत्वावर सन १९९९-२००० पासून सुरु करण्यांस परवानगी दिलेली होती.** तदनंतर संस्थेने मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे रिट याचिका दाखल केली होती. त्या मा.न्यायालयीन निर्णयाचे अनुषंगाने शासनाने संदर्भीय पत्र क्र. २ नुसार **सुसंपन्न ज्ञान प्रसारक मंडळ, पुणे संचलित माध्यमिक विद्यालय,आढले खुर्द ता.मावळ जि.पुणे या शाळेस स्थलांतरास कार्योत्तर मान्यता दिलेली आहे.**

आता शिक्षणाधिकारी ( माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे यांचे कडील संदर्भीय क्र. ३ चे पत्राव्दारे स्वयंस्पष्ट शिफारस विचारात घेता **सुसंपन्न ज्ञान प्रसारक मंडळ, पुणे संचलित माध्यमिक विद्यालय,आढले खुर्द ता.मावळ जि.पुणे या कायम विना अनुदानित मराठी माध्यमाचे शाळेतील इ. ९ वी व इ. १० वी चे वर्गास सन २०१८-२०१९ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

१.प्रस्तुत प्रकरणी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२ माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे

३.विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.

४.संचनिश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.

५. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.

६.विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.

७.शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

८.सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षाच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

९ संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

१०.शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

११.अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष **१९९९-२०००** पासून असेल

१२.शैक्षणिक वर्ष **१९९९-२०००** मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत

१३.परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे ,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

१४ शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

**इतर अटी :**

जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१. शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी

२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत

३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याचो तसेच (National Building code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यांत यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदार शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांची राहील.

५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

६. **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकष, शर्ती, अटी यांच्या पूर्ततेसह शाळेस इमारत व भौतिक सुधारणा करणे बंधनकारक राहील.**

७. **महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम २००९ व नियम २०१६ चे पालन करणे बंधनकारक आहे.**

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तींची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल यांची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा.

MRaut
(मिनाक्षी राऊत )
**प्र.शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग पुणे-१.**

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**
१. मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय,आढले खुर्द ता.मावळ जि.पुणे
२. विभागीय सचिव, पुणे विभागीय शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे.
३. अध्यक्ष/सचिव सुसंपन्न ज्ञान प्रसारक मंडळ, पुणे
प्रत : माहितीसाठी सविनय सादर
१. मा.अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.
प्रत : माध्य-३०२ कार्यासन निवडनस्ती